# वय

प्रकाशित:


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



© पुनरारंभ



**website: http://www.rajratna.co.in** **Email: ratnakar.wani@rajratna.co.in**

# वय

वय ही मराठी बाराखडीतील अखेरच्या ओळीतील दोन साधी सरळ अक्षरे, ज्याला काना, मात्रा, उकार, विलांटी नाही वा अन्य कोणत्याही अलंकाराने सजलेली नाही. अशी मानव जिवनाशी निगडीत मानवी आयुष्याचा कालावधी सांगणारी ही दोन अक्षरे वय. "हे वयच वेडे असत", "आता वय झाले", "वय वाढले म्हणून काय झाले?" इत्यादी अनेक दूषणे-भुषणे यालाच लावली जातात. कारण हे नुसतेच वाढत नाही तर सोबत अनेक चांगल्या वाईट अनुभवांची शिदोरी गाठीशी बांधतच असते. श्वासात श्वास असेपर्यंत वय हा शब्द आपल्या मागे इतका घट्ट व सावलीसारखा उभा असतो की, कोणी तुमचे वय किती हा प्रश्न विचारताच झटकन उत्तर देतो. वयपरत्वे माणसाच्या गरजा अडी अडचणी आवडी निवडी पण बदलतात इतकेच नव्हे तर प्रसंगी स्वभाव देखिल बदलला असा आरोप केला जातो.

बंडोपंत व सदानंद दोघेही बालपणीचे षष्ठयब्दी पूर्ण केलेले मित्र. बंडोपंत थोडेसे नटखट विनोदी तर सदानंद नामाप्रमाणे सदैव आनंदी. सदानंदाला चहा प्रिय भारी. एक कप चहासाठी तो कितीही चालायला व कोठेही जायला तयार असतो. बंडोपंतांच्या एक निमंत्रणावर सदानंद त्यांच्याकडे हजर झाला. चहापाणी झाल्यावर बंडोपंत, वयाची ७९ पार केलेली व सहस्त्रचंद्रदर्शनाची वाट पहात असलेली त्यांची आई, सौ.बंडोपंत व सदानंद यांच्यात गप्पांची मैफिल रंगली. बोलता बोलता बालपणीच्या आठवणी निघाल्या. बंडोपंताच्या बालपणातील आठवणी सांगतांना त्यांची आई म्हणाली आमचा बंडू बालवया पासूनच खोडकर व्रात्य आहे.

बालपणी बालवाडीत रोज त्याला मी पोळी-भजी कधी शिरा तर कधी शंकरपाळे-चिवडा असा वेगवेगळा खाउ डब्यात देत असे. पण आमचा हा बंडया रोज काही न खाता डबा जसाचा तसा परत आणीत असे. हा काही खात का नाही? याचे काही दुखते आहे काय? काही त्रास होतो का? या विचारांनी मी ग्रासले होते. एक दिवस त्याला मी वैद्यांकडे तपासण्यासाठी नेले. वैद्यांनी याला काही झालेले नाही सर्व ठिक आहे असे सांगितले. त्याच वैद्यांचा त्याच्या वयाचा मुलगा पण त्याच बालवाडीत जात असे. दुसरे दिवशी त्यांचा मुलगा रडत रडत घरी सांगू लागला की माझा डबा बंडयाने खाल्ला. अधिक चौकशी अंती समजले की बंडया रोज आपला डबा न काढता कोणाचा अन् कोणाचा डबा संपवित होता.

एकदा आम्ही मोठे सर्वजण काही कामासाठी एक दिवसा पूरते बंडयाला शेजारच्या जोशी काकुंच्या भरवशावर ठेउन बाहेरगावी गेलो. घरात ओरडण्यास मोठे कोणी नाही ही तर बंडयासाठी पर्वणीच ठरली. दुपारी हा बंडया आणि त्याचे शेजारी पाजरी सर्व बालमित्र जमा झाले. रोज रोज तीच तीच शाळा व शिक्षक खेळण्यापेक्षा आज आपण "वयम् मोठे खोटम्" नाटक खेळूया ही बंडयाची कल्पना सर्व बालमित्रांना आवडली. त्वरेने कारवाई करित घरातील चादरी, साडया व सतरंजा वापरून ओसरीवर छोटासा रंगमंच उभारला. सुरवातीला आई, बाबा, काकू, काका, बाळया, चिंगीताई तसेच आजोबा या अनेक भुमिका कोणी करावयाच्या यावर थोडेसे रूसवे फुगवे झाले. ब–याच खलानंतर नाटकातील पात्रांची वाटणी झाली व सर्वांना शिस्त लावण्याची महत्वाची मख्य आजोबाची भुमिका बंडयाने करण्याचे सर्वांमते ठरले. सर्वजण आपापल्या घरी जाउन साजेशी वेशभुषा करून आले. मुलींनी साडया नेसल्या. मुलांनी वडिलांचे कोट टोपी घालून वेश भूषा केल्या. मेकप करण्यास पावडर गंध हे असलेच पाहिजे त्याशिवाय मेकप पूर्ण कसा होणार. कोणाच्याही घरून पावडर गंध न मिळाल्याने अखेरीस आमच्या घरातील माझा पावडरचा डबा व गंधाची बाटली पूर्ण खाली करून नाटकाला सर्व सज्ज झाले. नाटक छानपणे चालले होते. सर्वजण आपापल्या भुमिकेत पूर्णतया एकाग्र रममाण झाली होती. मुळातच वात्रट व धांदरट असलेला व नाटकात खोडकर बाळयाची भुमिका बजावित असणा–या देशपांडयांच्या मुलाला आजोबा काठीने चोप देतात या प्रसंगाच्या वेळी आमच्या या बंडयाने त्या बाळयाला खरोखरीच सास–यांच्या काठीने झोडपले. बाळया रडला गहिवरला तरी बंडया त्याला झोडत राहिला. ही बाब इतर मुलांनी बाळयाच्या आईला जाउन सांगितली तशा देशपांडे बाई धावतच आल्या आणि बंडयाला आवरले. बंडयाला पण चांगलाच प्रसाद दिला. असा हा आमचा बंडया बालवयापासूनच खोडकर आहे.

नित्य नियमाप्रमाणे बंडोपंत आणी सदानंद दोघेही टेकडीवर संध्याकाळी फिरावयास गेले. टेकडी चढतांना बंडोपंतांचा पाय घसरला. पडता पडता त्यांनी स्वतःला सावरले. मागोमाग चाललेल्या सदानंदाच्या ही गोष्ट लक्षात आली. सदानंद विनोद बुध्दीने म्हणाले, "अरे बंडू हे काय पाय घसरायचे वय आहे काय?" त्यावर तत्परतेने बंडोपंत उत्तरले, "अरे माझा तर फक्त पायच घसरला पण परवा तर या वयात गंमतच तुझे पाय अडले होते त्याचे काय? पाय अडायला तु काय स्त्री आहेस काय? आहे बुवा. दोघानी आपले वय विसरून एकमेकावर केलेल्या टिप्पणीने त्यांच्या समवेत चालणा–या सहका–यांची घडीभरासाठी करमणुक झाली.